BCI Better Cotton Initiative

गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादन कार्यक्रम

दिलासा जनविकास प्रतिष्ठान

दिलासा जनविकास प्रतिष्ठान

बी-३, सुदर्शन पार्क, एमआयडीसी विभागीय कार्यालयासमोर, वेदांतनगर, औरंगाबाद-४३१ ००५
☎(०२४०) २३२०४४४, २३६३७४१, फॅक्स (०२४०) २३६३७४१, ईमेल : dilasango@gmail.com

गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादन कार्यक्रम

डॉ. अनघा पाटील

दिलासा जनविकास प्रतिष्ठान

बी-३, सुदर्शन पार्क, एमआयडीसी विभागीय कार्यालयासमोर, वेदांतनगर, औरंगाबाद-४३१ ००५
☎(०२४०) २३२०४४४, २३६३७४१, फॅक्स (०२४०) २३६३७४१, ईमेल : dilasango@gmail.com

गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादन कार्यक्रम

■ लेखक
डॉ. अनघा पाटील

■ मुखपृष्ठ व संगणकीय जुळणी
रवि बोराडे
दिलासा जनविकास प्रतिष्ठान,
औरंगाबाद

■ मुद्रक व प्रकाशक
दिलासा जनविकास प्रतिष्ठान
बी-३, सुदर्शन पार्क, वेदांतनगर,
औरंगाबाद
दूरध्वनी : (०२४०) २३२०४४४, २३६३७४१
ईमेल : dilasango@gmail.com
वेबसाईट : www.dilasango.org

■ प्रकाशन दिनांक
२२ मे २०१५

© दिलासा जनविकास प्रतिष्ठान, औरंगाबाद

(Dilasa2)D:Publication\BCI\Cotton-Book-24-7-2015.cdr

अनुक्रमणिका

प्रास्ताविक १

बीसीआय कार्यक्रम आणि दिलासा संस्था २

दिलासा-पीसीआय-नेटाफेम-मनजीत कॉटन यांची सहभागीता २

गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादन कार्यक्रमाची (बीसीआय) ओळख ३

बीसीआय कार्यक्रमाची उद्दिष्टे ४

गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादनाची तत्त्वे ४

प्रास्ताविक

कापूस हे भारतातीलच नव्हे तर सबंध जगातील एक अत्यंत महत्त्वाचे पीक आहे. कारण अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या तीन गरजांपैकी वस्त्राची गरज भागवण्यामध्ये कापूस हे मानवासाठी वरदानच आहे. त्यामुळेच जागतिक पातळीवर कापसाची मागणीही वेगाने वाढत आहे. कापूस हे २५० दशलक्ष लोकांचे उपजीविकेचे साधन आहे. केवळ कपडा तयार करण्यासाठी नव्हे तर लाकडी सामान, टॉवेल्स, सतरंजा अशा वेगवेगळ्या गोष्टींच्यामध्ये कापसाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होते.

एकंदरीत कापूस हा पुन्हा पुन्हा निर्माण होणारा पृथ्वीवरील मौल्यवान असा संपत्तीचा ठेवा आहे. परंतु दुसरीकडे अद्यापही कापसाच्या गुणवत्तेकडे शेतकरी तितकेसे लक्ष देत नाहीत. त्यामुळे जागतिक बाजारपेठेतच नव्हे तर स्थानिक बाजारपेठेतही कापसाला योग्य भाव मिळत नाही. कापूस उत्पादनाच्या पद्धतीत सुधारणा करून कापसाला उत्तम बाजारपेठ मिळवून देणे आवश्यक होते. त्यासाठी बीसीआय कार्यक्रम सुरू करण्यात आला.

या कार्यक्रमाद्वारे खालील बाबी साध्य करण्यात येणार आहेत.

१) ७००० शेतकऱ्यांपर्यंत पोहचणे आणि त्यांची क्षमता बांधणी करणे.

२) ५६० महिलांपर्यंत पोहचणे.

३) सर्वसाधारणपणे २०० गावांमध्ये हा कार्यक्रम राबविणे.

४) सुमारे १७५०० हेक्टरवर हा कार्यक्रम राबविणे.

५) कार्यक्रमाद्वारे १८२०० मेट्रिक टन कापूस उत्पादनाचे उद्दिष्ट गाठणे.

६) शेतकऱ्यांचे २०० अभ्यास गट तयार करणे.

७) कापसाचे उत्पादन वाढविणे.

८) कापूस उत्पादनाच्या उत्कृष्ट पद्धतीमध्ये वाढ करणे.

बीसीआय कार्यक्रम आणि दिलासा संस्था

बीसीआय म्हणजेच गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादन कार्यक्रम दिलासा या स्वयंसेवी संस्थेमार्फत राबविला जात आहे. खेड्यांचा विकास हाच एक ध्यास घेऊन गेली २० वर्षे संस्था पाणी, महिला सक्षमीकरण, प्रशिक्षण, कृषी विकास या विविध क्षेत्रात कार्य करीत आहे. उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा या विभागातील अत्यंत दुर्लक्षित आडवळणाच्या विकासापासून दूर असलेल्या २००० खेड्यांमध्ये संस्थेने विविध प्रकल्प राबविले. ग्रामीण विकास, पाणलोट क्षेत्र विकास, महिला सक्षमीकरण यातील गौरवास्पद कामाबद्दल संस्थेला राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले आहे.

बीसीआय प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांचे संघटन, क्षमता बांधणी, जाणीव जागृती अशा विविध भूमिका दिलासा करीत आहे. हा प्रकल्प परभणी, बीड, आणि औरंगाबाद जिल्ह्यातील विविध खेड्यांमधून राबविला जात आहे. गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादन घेऊन जागतिक बाजारपेठेत स्थान मिळविणे, शेतकऱ्याचा आर्थिक विकास करणे ह्यावर प्रकल्पाचा भर आहे. या प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती खालील भागात दिली आहे.

दिलासा-पीसीआय-नेटाफेम-मनजीत कॉटन यांची सहभागीता

Manjeet Cotton
Private Limited

बीसीआय हा प्रकल्प राबविताना **दिलासा संस्था पेस्ट कंट्रोल ऑफ इंडिया (पीसीआय), नेटाफेम आणि मनजीत कॉटन** यांची महत्त्वाची भूमिका आहे. संस्था गावपातळीवर शेतकऱ्यांचे संघटन, प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी करेल तसेच बँकेच्या मदतीने शेतकऱ्यांना ठिबक संच मिळवून देईल. **पेस्ट कंट्रोल ऑफ इंडिया (पीसीआय)** ही संस्था पिकावर येणारे वेगवेगळे रोग, त्याची कारणे, त्याचा प्रतिबंध याविषयी मार्गदर्शन करेल. नेटाफेम ही ठिबक सिंचनाच्या क्षेत्रातील प्रसिद्ध कंपनीमार्फत शेतकऱ्यांच्या शेतावर ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब केला जाईल. **मनजीत कॉटन** ही कापसाच्या खरेदी-विक्रीमधील मोठी कंपनी उत्कृष्ट पद्धतीचा कापूस खरेदी करेल.

गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादन कार्यक्रमाची (बीसीआय) ओळख

बीसीआय ही गुणवत्तापूर्ण कापसाच्या उत्पादनाला चालना देणारी महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेला जगातील पाचशे मोठ्या कंपन्यांची साथ आहे. त्यामार्फत गुणवत्तापूर्ण कापसाच्या उत्पादनासाठी तत्त्वे, तसेच काही किमान निकष तयार केले गेले आहेत. केवळ गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठी ही संस्था काम करते असे नाही तर उत्पादक शेतकरी आणि व्यापारी यांना एकत्र आणून कापसाला उत्तम बाजारपेठ मिळवून देते. सध्या बीसीआय जगामधल्या २० देशांतल्या एक अब्ज शेतकऱ्यांपर्यंत पोहचली आहे. एकंदरीत कापूस उत्पादना पद्धतींमध्ये मूलभूत सुधारणा घडवून कापसाला जागतिक बाजारपेठ मिळवून देणे यावर संस्थेचा भर आहे. थोडक्यात, बीसीआय

कार्यक्रम म्हणजे लक्षावधी शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण कापसाकडे घेऊन जाणारा राजमार्गच आहे. जो राजमार्ग शेतकऱ्यांसाठी तसेच आजूबाजूच्या वातावरणासाठीही हितकारक आहे. त्याचप्रमाणे वातावरणाची हानी टाळणारा आहे. सध्या ज्या पद्धतीने कापूस पिकविला जात आहे त्याचे सभोवतालच्या वातावरणावर, व्यक्तींवर आणि जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत. त्यामुळेच जागतिक पातळीवर उत्कृष्ट (गुणवत्तापूर्ण) कापूस उत्पादनाची प्रमाणित पद्धत विकसित करण्याची गरज निर्माण झाली. त्यातूनच २००९ मध्ये बीसीआय या संस्थेची सुरुवात झाली.

बीसीआय कार्यक्रमाची उद्दिष्टे

१ कापूस उत्पादनाचे पर्यावरणावर होणारे हानिकारक परिणाम कमी करणे

२ कापूस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करून त्यांच्या उपजीविकेमध्ये सुधारणा करणे.

३ गुणवत्तापूर्ण कापसाच्या पुरवठ्यासाठी उत्पादकांची पुरवठासाखळी तयार करणे.

४ बीसीआय कार्यक्रमाची विश्वासार्हता आणि त्यातील सातत्य टिकवून ठेवणे.

गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादनाची तत्त्वे

१ पीक संरक्षणाच्या हानिकारक पद्धती टाळणे

२ पाण्याचा कार्यक्षम वापर करणे

३ मातीच्या आरोग्याची देखभाल करणे

४ नैसर्गिक प्रजातींचे रक्षण करणे

५ कापसाच्या दर्जेदार धाग्याची निर्मिती

६ कापूस उत्पादनामध्ये उत्कृष्ट कामाच्या पद्धतींचा अवलंब करणे

१ पीक संरक्षणाच्या हानिकारक पद्धती टाळणे

पीक संरक्षण करण्यासाठी शेतकरी निरनिराळ्या औषधांची फवारणी करतात. बरेचदा हानिकारक किडीचा नायनाट करताना मित्रकिडीचाही नायनाट होतो. हे टाळून सशक्त आणि निरोगी पिकांची वाढकरणे आवश्यक असते. त्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो.

१.१) एकात्मिक कीड नियंत्रण :

१. पिकांची सुदृढआणि जोमदार वाढ

२. किडींची वाढती संख्या कमी करून रोगाचा फैलाव थांबविणे

३. मित्रकिडींचे जतन आणि वाढकरणे

४. पिकांकडे नियमित लक्ष देणे, विशेषतः मित्रकीड आणि शत्रूकीड ओळखणे. शत्रूकिडींचा नायनाट करून फायदेशीर कीटकांची सातत्याने देखभाल करणे आणि पिकाच्या आरोग्याची काळजी घेणे.

५. कीड प्रतिकार क्षमतेचे व्यवस्थापन करणे (सध्या अवाजवीय औषधे, कीटकनाशके यांच्या अयोग्य तसेच काही वेळेस अतिवापराने पिकामध्ये नको तितकी प्रतिकार क्षमता वाढते आणि कोणत्याही फवारणीचा फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे किडीबाबत प्रतिकार क्षमता वाढवताना काळजी घेणे आवश्यक आहे. थोडक्यात पिकांमध्ये योग्य प्रमाणात प्रतिकार क्षमता निर्माण करणे, त्यावर नियंत्रण ठेवणे यालाच कीड प्रतिकार क्षमतेचे व्यवस्थापन म्हटले जाते.

१.२) मान्यताप्राप्त कीटकनाशकांचा वापर

१) ज्या कीटकनाशकांची नोंदणी राष्ट्रीय पातळीवरती झालेली आहे अशा मान्यताप्राप्त कीटकनाशकांचा वापर करणे.

२) त्या कीटकनाशकांवर राष्ट्रीय भाषेत लेबल असणे अत्यावश्यक

१.३) स्टॉकहोम कन्व्हेन्शनने प्रसिद्ध केलेल्या यादीतील कीटकनाशकांचा वापर टाळणे म्हणजेच बंदी असलेली कीटकनाशके न वापरणे.

१.४ कीटकनाशके तयार करणे आणि वापरणे - अ) निरोगी, ब) कुशल अनुभवी व्यक्तीं (क) १८ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींनीच कीटकनाशके हाताळावीत. गर्भवती स्त्रिया किंवा शुश्रूषा करणाऱ्या व्यक्तींनी कीटकनाशकांचा वापर टाळावा.

१.५ कीटकनाशकांबाबत दक्षता - अ) जागतिक आरोग्य संघटनेने बंदी घातलेल्या क्लास १-अ व १-ब

मधील हानिकारक कीटकनाशकांचा वापर टाळणे, ब) रॉटरडॅम कन्व्हेन्शनमधील अनेक्चर-३ मध्ये समाविष्ट केलेली कीटकनाशके टाळणे.

१.६ कीटकनाशकांचे मिश्रण तयार करताना, तसेच त्यांची फवारणी करताना सुरक्षितता बाळगावी. विविध साधने, उपकरणे याबाबत दक्षता बाळगावी.

१.७ कीटकनाशक फवारणी यंत्र तसेच फवारणीच्या भांड्यांची हाताळणी योग्य तऱ्हेने करावी. त्यांना सुरक्षित जागेत ठेवावे. पर्यावरणाला हानी पोचणार नाही याची काळजी घ्यावी.

१.८ योग्य हवामानाच्या स्थितीतच कीटकनाशकांचा उपयोग करावा. विशेषतः वाऱ्याची दिशा लक्षात घेऊन औषधांची फवारणी करावी. कीटकनाशकांच्या लेबलवर कंपनीने दिलेल्या सूचनांनुसार औषधांचा वापर करावा.

१.९ कीटकनाशकांचा वापर केल्यानंतर रिकामे डबे, बाटल्या, बरण्या याची योग्य विल्हेवाट लावावी.

२ पाण्याचा कार्यक्षम वापर करणे

२.१ पाण्याचा योग्य वापर होण्यासाठी पाणी व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे.

२.२ जल व्यवस्थापनाच्या पद्धती अशा असाव्यात की, ज्यामुळे भूजलावर दुष्परिणाम होणार नाही. पाण्याचा बेसुमार उपसा थांबेल आणि पाण्याची बचत होईल.

फवारणी करताना घ्यावी काळजी

- बंदी असलेल्या कीटकनाशकांचा वापर टाळवा.
- कीटकनाशके वापरताना सुरक्षितता बाळगणे आवश्यक आहे. फवारणीची साधने सुरक्षित आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. फवारणीच्या वेळी तोंडाला मास्क, रुमाल, कोट अशा साधनांचा वापर करावा.
- फवारणी झाल्यानंतर यंत्र सुरक्षित जागी ठेवावे. बाटल्या, बरण्या, कॅन यांची योग्य विल्हेवाट लावावी.
- फवारणी करत असताना वाऱ्याची दिशा पाहून योग्य तऱ्हेने फवारणी करावी. व्यक्ती आरोग्याला धोका पोहचणार नाही याची काळजी घ्यावी.

३ मातीच्या आरोग्याची देखभाल करणे

३.१ माती व्यवस्थापनाच्या अशा पद्धती अवलंबल्या पाहिजेत की त्यामुळे मातीचा पोत आणि सुपिकता टिकून राहील.

३.२ मातीचे परीक्षण करून पिकाच्या गरजेनुसार पोषक अन्नद्रव्ये दिली जावीत.

३.३ माती व्यवस्थापनाच्या अशा पद्धती अवलंबिल्या पाहिजेत की ज्यामुळे जमिनीची धूप थांबेल आणि वाहून जाणाऱ्या पाण्याला अटकाव केला जाईल त्यामुळे पाण्याचे संधारण होईल.

४ नैसर्गिक प्रजातींचे रक्षण करणे

४.१ कापूस उत्पादित करतांना शेताच्या परिसरातील जैव विविधतेचे जतन केले जावे.

४.२ शेतजमिनी बाबतचे कायदे लक्षात घेऊनच जमिनीचा वापर करावा. शेतजमिनीच्या कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेतली जावी.

५ कापसाच्या दर्जेदार धाग्याची निर्मिती

५.१ गुणवत्तापूर्ण कापसाच्या वाढीसाठी अशा व्यवस्थापन पध्दती उपयोगात आणल्या पाहिजेत की ज्यामुळे कापसाच्या धागयाची गुणवत्ता वाढेल.

५.२ कपाशीची वेचणी आणि साठवणूक पध्दतशीरपणे करणे की ज्यामुळे तो खराब होणार नाही आणि नुकसान टळेल.

मातीचे आरोग्य

- जास्तीची खते, अन्नद्रव्ये देणे टाळवे.
- गांडूळ खत, हिरवळीचे खत तयार करून जमिनीची सुपीकता टिकवावी.
- शेताची बांधबंदिस्ती करावी, त्यामुळे मातीची ओल टिकून राहील आणि पाणी मुरण्यास मदत होईल.

६ कापूस उत्पादनामध्ये उत्कृष्ट कामाच्या पद्धतींचा अवलंब करणे

६.१ संघटनेचे स्वातंत्र्य - यात कापूस उत्पादनाशी संबंधीत शेतकरी, शेतमजूर आणि इतर संबंधीत व्यक्तींना आपल्या हितासाठी संघटना स्थापन करण्यसाचा अधिकार आहे.

६.२ आरोग्य आणि सुरक्षितता - कामाच्या ठिकाणी पिण्यायोग्य, इतर कामासाठी वापरण्या योग्य पाणी उपलब्ध असावे.

६.३ बालमजूर - आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेच्या मार्गदर्शन सूचंनानुसार बालकामगारांना कामावर घेण्यास बंदी आहे.

६.४ धोकादायक कामांमध्ये मुलाचे वय कमीतकमी १८ किंवा त्यापेक्षा जास्त असावे.

६.५ जबरदस्तीने काम करून घेणे - शेतकरी किंवा इतर काम करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या पसंतीचे काम निवडण्याचा अधिकार आहे. कोणाही व्यक्तीवर काम जबरदस्तीने लादता येणार नाही.

६.६ भेदभाव - जात, धर्म, मजुरीचे दर, लिंग या आधारे शेतकऱ्याने कामावर कोणताही भेदभाव करू नये. ज्यामुळे भेदभाव निर्माण होईल किंवा समानसंधी नाकारली जाईल असे कोणतेही कृत्य करू नये. एखादी व्यक्ती विशीष्ट समूहाची आहे किंवा संघटनेची आहे म्हणून भेदभाव केला जाऊ नये.

मित्रकिडींचे संगोपन

- कापसावरील मित्रकीडीचे संगोपन करावे.
- शेतातील गांडूळ, पक्षी, बेडूक, साप इत्यादी उपयुक्त जीवांचा नाश होणार नाही, याची काळजी घ्यावी.

जपावे पांढरे सोने

कापूस वेचणी ते विक्री पर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर काळजी घेणे आवश्यक आहे. उदा. कापूस वेचल्यानंतर तो स्वच्छ जागेत ठेवावा. काडीकचऱ्यापासून त्याचा बचाव करावा ज्यामुळे कापसाच्या धाग्याची गुणवत्ता टिकून राहील.

होणारे फायदे

- कापूस उत्पादनावर होणारा खर्च कमी होईल.
- कापसाचा दर्जा सुधारून चांगला भाव मिळेल.
- जमिनीची पोत राखून सुपिकता वाढेल
- नैसर्गिक प्रजातीचे संगोपन झाल्यामुळे नैसर्गिक समतोल साधला जाईल.
- कुटुंबाचे आरोग्याला कीटकनाशकाच्या दूष्प्रभावापासून वाचवता येईल.

काय कराल?

कापूस वेचणी ते विक्री पर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर काळजी घेणे आवश्यक आहे. उदा. कापूस वेचल्यानंतर तो स्वच्छ जागेत ठेवावा. काडीकचऱ्यापासून त्याचा बचाव करावा ज्यामुळे कापसाच्या धाग्याची गुणवत्ता टिकून राहील.

नको भेदाभेद

- स्त्री आणि पुरुषांच्या मजुरीच्या दरात फरक करता कामा नये.
- घरातील मुला-मुलींना शाळा बुडवून शेतीच्या कामावर नेवू नये.
- शेतावर काम करणाऱ्या विविध जातीधर्माच्या लोकांना भेदभावाची वागणूक देऊ नये.
- कापूस वेचणी ते विक्री पर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर काळजी घेणे आवश्यक आहे. उदा. कापूस वेचल्यानंतर तो स्वच्छ जागेत ठेवावा. काडी कचऱ्यापासून त्याचा बचाव करावा ज्यामुळे कापसाच्या धाग्याची गुणवत्ता टिकून राहील.
- कापूस उत्पादन करताना आरोग्य व निसर्गाची काळजी घ्यावी.